**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**शनिवार दिनांक १४ डिसेंबर २०२४**

**ठळक बातम्या**

1. राज्य मंत्रिमंडळाचा शपथविधी उद्या नागपुरातील राजभवनात; सोमवारपासून हिवाळी अधिवेशनास सुरूवात.
2. 'एक देश-एक निवडणूक'शी संबंधित दोन विधेयकं लोकसभेत सोमवारी केली जाणार सादर.
3. समाजाच्या तळागाळातला प्रत्येक व्यक्ती यशस्वी, आत्मविश्वासपूर्ण आणि सुसंस्कृत व्हावा हा खासदार सांस्कृतिक महोत्सवाचा उदेष्य - केंद्रीय मंत्री नितीन गडकरी.
4. 16 डिसेंबर पर्यंत चालणाऱ्या पीएम विश्वकर्मा प्रदर्शनाचं आमदार मोहन मते यांच्या हस्ते उद्घाटन.

--------------------------------

**मंत्रिमंडळाचा उद्या विस्तार**

महाराष्ट्रातल्या नवनिर्वाचित सरकारच्या मंत्रिमंडळाचा शपथविधी उद्या रविवारी सायंकाळी चार वाजता नागपूर इथं राजभवनात होणार आहे. राजभवनातून ही माहिती देण्यात आली. येत्या सोमवारपासून राज्य सरकारचं हिवाळी अधिवेशन नागपुरात होत आहे. त्याच्या पूर्वसंध्येला हा मंत्रिमंडळ विस्तार केला जाणार आहे. दरम्यान, मंत्र्यांची यादी भाजपच्या केंद्रीय नेतृत्वाकडे पाठवली असून तेथून मंजुरी मिळाल्यानंतर संबंधित आमदारांना सूचित केलं जाईल, अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी माध्यमांना दिली.यापूर्वी ५ डिसेंबर रोजी मुंबईत एका भव्य समारंभात देवेंद्र फडणवीस यांनी मुख्यमंत्री पदाची तर एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांनी उपमुख्यमंत्रीपदाची शपथ घेत नवं सरकार स्थापन केलं आहे.

--------------------------------

**वन नेशन, वन इलेक्शन**

'एक देश-एक निवडणूक'शी संबंधित दोन विधेयकं लोकसभेत सोमवारी सादर केली जाणार आहेत. केंद्रीय कायदा मंत्री अर्जुनराम मेघवाल संविधान सुधारणा विधेयक आणि केंद्रशासित प्रदेश कायदा सुधारणा विधेयक लोकसभेत मांडतील. 'एक देश - एक निवडणूक' या संकल्पनेची पडताळणी करण्यासाठी स्थापन करण्यात आलेल्या

उच्चस्तरीय समितीच्या शिफारसी नुकत्याच सरकारने स्वीकारल्या असून देशभरात एकाचवेळी निवडणूका घेण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.माजी राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांच्या अध्यक्षतेखालील समितीने विविध राजकीय पक्षांसह तज्ञांशी याबाबत विस्तृत चर्चा केली. या अंतर्गत निवडणूक प्रक्रिया दोन टप्प्यात राबवली जाईल. पहिल्या टप्प्यात लोकसभेची निवडणूक आणि सर्व राज्यांच्या विधानसभा निवडणुका घेतल्या जातील. तसंच या निवडणुका झाल्यानंतर शंभर दिवसांच्या आत दुसऱ्या टप्प्यात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घेतल्या जातील.

--------------------------------

कृषी कर्जाची मर्यादा

भारतीय रिझर्व्ह बँकेनं तारणमुक्त कृषी कर्जाची मर्यादा एक लाख साठ हजारांवरून दोन लाख रुपयांपर्यंत वाढवण्याची घोषणा केली आहे .या निर्णयाची अंमलबजावणी येत्या एक जानेवारीपासून होणार आहे .शेतकऱ्यांना अधिक चांगली वित्तीय सुविधा पुरवणं हा यामागील उद्देश आहे, असं कृषी आणि शेतकरी कल्याण मंत्रालयानं दिलेल्या एका निवेदनात सांगितलं आहे.

--------------------------------

गस्ती वाहनं

भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणानं रस्ते सुरक्षा आणि महामार्गावरची गस्ती आणखी वाढवण्याच्या उद्देशाने महामार्गावर 'राजमार्ग साथी' या नावानं नवीन गस्ती वाहनं सुरु केली आहे. ही वाहनं आधुनिक तंत्रज्ञान आणि सुरक्षा उपकरणांनी सुसज्ज असून यामुळे वाहतूक कोंडी कमी व्हायला आणि प्रवास सुरक्षित व्हायला मदत होणार आहे. यात बसवलेल्या कॅमेऱ्यांच्या माध्यमातून वाहतूक कोंडी, रस्त्यांवरचे खड्डे आणि इतर अडथळे शोधायलाही मदत होणार आहे.

--------------------------------

112 वा दीक्षांत समारंभ

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचा 112 वा दीक्षांत समारंभ येत्या 16 डिसेंबर रोजी दुपारी 12 वाजता ऑडोटोरियम हॉल, नॅशनल फायर सर्व्हिस कॉलेज, राजनगर, नागपूर येथे होणार असून समारंभाचे अध्यक्षस्थानी महाराष्ट्र राज्याचे मा. राज्यपाल तथा विद्यापीठाचे कुलगुरू सी.पी. राधाकृष्णन राहतील. या दीक्षांत समारंभामधे 1 लाख 03 हजार 303 विद्यार्थ्यांना पदवी/ पदविका प्रदान करण्यात येणार आहे. दीक्षांत समारंभात परीक्षेमधे स्पृहणीय यश संपादन केल्याबद्दल 227 पुरस्कार वितरित केल्या जाणार आहे. समारंभाला विद्यापीठ व्यवस्थापन परिषदेचे

सन्माननीय सदस्य तसेच सर्व विद्याशाखांचे सन्माननीय अधिष्ठाता उपस्थित राहणार असल्याची माहिती राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचे प्रभारी कुलगुरू डॉ.प्रशांत बोकारे यांनी विद्यापीठाच्या जमनालाल बजाज प्रशासकीय भवनातील सभा कक्षात आयोजित पत्रकार परिषदेत दिली. हिवाळी 2023 व उन्हाळी 2024 मधे घेण्यात आलेल्या परीक्षेमधे स्नातक पदवीधर, 84,310 तर स्नातकोत्तर पदवीधर 18,772 विद्यार्थ्यांचा समावेश आहे. विद्यापीठातंर्गत शिक्षक व संशोधक विद्यार्थी संशोधनाचे कार्य करतात.या दीक्षांत समारंभात विद्याशाखा निहाय 221 संशोधकांना आचार्य पदवी देवून सन्मानित करण्यात येणार आहे. पारितोषिकांमधे 193 सुवर्ण,8 रजत व 26 रोख असे एकूण 227पुरस्कार दिल्या जाणार आहेत. यामधे 95 मुली आणि 48 मुलांचा समावेश असल्याची माहिती त्यांनी दिली.

--------------------------------

खासदार सांस्कृतिक महोत्सव

खासदार सांस्कृतिक महोत्सवाचा उदेष्य केवळ मनोरंजन करणे हा नसून समाजाच्या तळागाळातला प्रत्येक व्यक्ती यशस्वी, आत्मविश्वासपूर्ण आणि सुसंस्कृत व्हावा,हा आहे, असे प्रतिपादन केंद्रीय मंत्री व खासदार सांस्कृतिक महोत्सवाचे प्रणेते नितीन गडकरी यांनी येथे केले.नितीन गडकरी यांच्या संकल्पनेतून साकारलेल्या खासदार सांस्कृतिक महोत्सवाच्या नवव्या पर्वाला काल प्रारंभ झाला. त्याप्रसंगी ते अध्यक्षस्थानावरून संबोधित करीत होते. ते म्हणाले की-

*गेल्या नऊ वर्षापासून आपण हा कार्यक्रम करतो आहे. यामागे केवळ मनोरंजन करणं हा उद्देश नाही. या नागपूरच्या जनतेला विशेषतः सांस्कृतिक क्षेत्रामध्ये नागपूरची प्रगती व्हावी, विकास व्हावा आणि सांस्कृतिक मूल्य देखील लोकांपर्यंत पोहोचली पाहिजे, या भावनेतून हा खासदार सांस्कृतिक महोत्सव आपण आयोजित केला आहे.*

हनुमान नगरातील क्रीडा चौक येथील ईश्वर देशमुख शारीरिक शिक्षण महाविद्यालयाच्या पटांगणातकलागुणांचा संगम असलेल्या या प्रसिद्ध महोत्सवाचे उद्घाटन सुप्रसिद्ध अभिनेत्री पद्मश्री काजोल यांच्या हस्ते झाले. याप्रसंगी संस्कार भारती च्या अध्यक्ष कांचन गडकरीप्रामुख्याने उपस्थित होते. महोत्सवाचे उद्घाटन झाल्यानंतर संस्कार भारती, नागपूर तर्फे 'मैं हूं भारत' हा भारतीय इतिहासाची गौरवशाली गाथा विशद करणारा व बाराशे कलावंतांचा सहभाग असलेला भव्य सांस्कृतिक कार्यक्रम झाला. वेदकाळापासून आज पर्यंतचा भारताचा प्रदीर्घ इतिहास भक्तिगीते, देशभक्तीची नवी गीते, शास्त्रीय व लोकनृत्य, पोवाडा, गोंधळ अशा विविध कलाप्रकारांतून यावेळी उलगडला गेला. आज सकाळी भक्तिमय वातावरणात

**श्री हनुमान चालीसा पठण झाले तर संध्याकाळी 'अपने अपने राम' अंतर्गत डॉ. कुमार विश्वास यांचे मर्मज्ञ प्रवचन होणार आहे.**

**--------------------------------**

**विश्वकर्मा प्रदर्शनी**

**शिल्पकारांना त्यांची उत्पादने आणि कौशल्य प्रदर्शित करण्यासाठी एक व्यासपीठ मिळावे, त्यांना विपणन संधी मिळून त्यांचे उद्यम वाढण्यास मदत व्हावी या उद्देशाने भारत सरकारच्या सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग मंत्रालयच्या एम एस एम ई विकास कार्यालय नागपूरच्या वतीने पी एम विश्वकर्मा प्रदर्शनी व विक्रीचे नागपुरातील रेशीमबाग मैदान येथे आयोजन करण्यात आलेले असून या प्रदर्शनीचे उदघाटन आमदार मोहन मते यांच्या हस्ते करण्यात आले. 16 डिसेंबर पर्यंत ही प्रदर्शनी सुरू राहणार असून या प्रदर्शनीमध्ये शिल्पकार आणि कारागिरांनी तयार केलेल्या वस्तू येथे विक्रीसाठी ठेवण्यात आलेल्या आहेत. एमएसएमई विकास कार्यालय नागपूरचे संयुक्त संचालक डॉ. व्ही.आर. सिरीसाठ यांच्यासह अनेक मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते. स्टॉस विषयी माहिती देताना डॉ. व्ही.आर. सिरीसाठ..**

***आजच्या प्रदर्शनी मध्ये एकूण 60 स्टॉल लागलेले आहे. यामध्ये 54 स्टॉल जे आहे ते विश्वकर्मांचे आहे आणि बाकीचे जे सहा स्टॉल्स आहेत वेगवेगळे ऑर्गनायझेशनचे आहेत. रिसोर्सिंग आणि स्टेक होल्डर्स आहेत. जसे एम गिरी आहे, पी एम पोर्ट आहे, बँक आणि स्किल डेव्हलपमेंट, डीएफओ यांचे स्टॉल इथे लागलेले आहे.***

**पीएम विश्वकर्मा योजनेचा उद्देश कारागीरांना विश्वकर्मा म्हणून सक्षम करणे आणि मान्यता देणे आहे. जेणेकरून ते त्यांचे उद्योग स्थापित करू शकतील. तसेच, या योजनेचे उद्दिष्ट त्यांना कौशल्य श्रेणीसुधारित करणे, त्यांची कौशल्ये वाढवणे, चांगल्या आणि आधुनिक उपकरणांसाठी सहाय्य प्रदान करणे, त्यांना संपार्श्विक मुक्त कर्जाचा सुलभ प्रवेश सुनिश्चित करणे आणि डिजिटल व्यवहारांसाठी प्रोत्साहन देणे हे आहे.**

**--------------------------------**

**फ्लॉवर शो**

**नागपूर शहरातील हिस्लॉप महाविद्यालयाच्या वनस्पतीशास्त्र विभागातर्फे 21व्या वार्षिक फ्लॉवर शोचे आयोजन करण्यात आले आहे. हे प्रदर्शन आज आणि उद्या असेल. या या प्रदर्शनीत 12,000 झाडे ठेवण्यात आली असून यात 50 हून अधिक जातींचा समावेश आहे. यात फुलांच्या प्रदर्शनात विविध प्रकारची आणि रंगीबेरंगी**

फुले पाहण्याची संधी नागरिकांना मिळणार आहे, अशी माहिती महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.प्रशांत शेळके यांनी दिली.

--------------------------------

दत्तजयंती

राज्यात आज सर्वत्र दत्तजयंतीनिमित्त ठिकठिकाणी वविविध कार्यक्रम होत आहेत. औदुंबर, गाणगापूर, माहूर, नृसिंहवाडी, कुरवपूर, कर्दळीवन या दत्ताच्या प्रमुख स्थानांसह विविध दत्त मंदिरात पहाटेपासून भाविकांची रीघ लागली आहे. यासह काकड आरती, मंगलआरती, अभिषेक, महापूजा, नैवेद्य, महाआरती,महाप्रसादासह विविध धार्मिक कार्यक्रम होत आहेत. सायंकाळी दत्तजयंती उत्सव, पालकी मिरवणूक आणि दत्तगुरू जन्माचा कीर्तनाचा कार्यक्रमही होणार आहे. नागपुरात देखील विविध मंदिरं आणि धार्मिक संस्था यांच्या तर्फे धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन केले आहे.

--------------------------------

कनिष्ठ गट हॉकी

महिला कनिष्ठ गट हॉकी आशिया चषक स्पर्धेत आज भारताचा सामना जपानबरोबर होणार आहे. ओमानची राजधानी मस्कत इथं ही स्पर्धा होत असून गेल्या गुरुवारी थायलंडवर भारताने ९-० असा दणदणीत विजय मिळवला होता. या विजयामुळे भारत उपांत्यफेरीत पोहोचला, तसंच पुढच्या वर्षी चिलीमधे होणाऱ्या एफआयएच कनिष्ठ गट जागतिक हॉकी स्पर्धेसाठी देखील पात्र ठरला आहे. आजचा सामना भारतीय प्रमाणवेळेनुसार संध्याकाळी ६ वाजता सुरु झाला आहे. दुसरा उपान्त्य सामना चीन आणि दक्षिण कोरियामधे होणार आहे.

--------------------------------

हवामान

येत्या दोन ते तीन दिवसांत उत्तर-पश्चिम आणि मध्य भारतात थंडीची लाट ते तीव्र शीतलहरीची स्थिती कायम राहील असं भारतीय हवामानशास्त्र विभागाने म्हटले आहे. आयएमडीचे शास्त्रज्ञ डॉ.सोमा सेन रॉय म्हणाले की, उत्तर भारतातील तापमानात अचानक झालेली घसरण वेस्टर्न डिस्टर्बन्समुळे आहे. नागपुरात आज 9.4 अंश सेल्सियस इतक्या किमान तपमानची नोंद करण्यात आली. गोंदिया इथं सर्वात कमी 8.8 तर वर्धा इथं 8.9 इतकं किमान तापमान नोंदविण्यात आलं.

*****